रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी -sceapune@gmail.com

**निवडणूक महत्वाचे** जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/दुसरा टप्पा/निवडणूक सुरू/आदेश/२९६९ /सन २०२१.
दिनांक : ३०/०९/२०२१.

**निवडणूक प्राधान्य**

**वाचावे** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुद

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१५) मधील परंतुक.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच)

५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन आदेश क्रमांक संकीर्ण ०१२०/ प्र.क्र. ७०/१३ स, दिनांक १८.०३.२०२०, १७.०६.२०२०, २८.०९.२०२०, १६.०१.२०२१, २४.०२.२०२१

६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन आदेश क्रमांक संकीर्ण ०१२०/ प्र.क्र. ७०/१३ स, दिनांक ०६.०४.२०२१

७. प्राधिकरणाकडील आदेश क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरू आदेश/२७२९/सन २०२१ दि.१३.०९.२०२१

८. प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. २५३२/सन २०२१ दि.२६.०८.२०२१

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) संचालन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार कोणत्याही संस्थांची किंवा संस्थांच्या वर्गाची निवडणूक पुढे ढकलण्याचे अधिकार शासनास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, कोव्हीड १९ विषाणूचा वाढता प्रभाव विचारात घेऊन शासनाने वाचावे क्रमांक ५ चे आदेशांनुसार वेळोवेळी ज्या प्रकरणी मा. उच्च/मा. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्याचे आदेशीत केलेले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका वेळोवेळी ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर पुढे ढकललेल्या होत्या. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार शासनाने वाचावे क्र.६ च्या आदेशानुसार ज्या प्रकरणी मा.उच्च / मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्याचे आदेशीत केलेले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका ज्या

टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३१.०८.२०२१ पर्यंत पुढे ढकलेल्या आहेत. निवडणूका पुढे ढकलण्याचा कालावधी दिनांक ३१.८.२०२१ रोजी समाप्त झालेला असून शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलणे संदर्भात नव्याने आदेश पारीत केलेले नाहीत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१५) मधील परंतुकानुसार शासनाने निवडणूका पुढे ढकललेला कालावधी समाप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाच्या सुचनेनुसार संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी संचालक मंडळ मुदत संपल्याचा दिनांक विचारात घेऊन, डिसेंबर २०२० अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांचा सहा टप्प्यांचा "जिल्हा निवडणूक आराखडा" तयार केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा निवडणूक आराखडयात दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंत संचालक मंडळाची / नियुक्त प्रशासक / प्राधिकृत अधिकाऱ्यांची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांचा समावेश टप्पा क्रमांक दोन मध्ये केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ८ च्या पत्रानुसार ज्या सहकारी संस्थांवर नियुक्त केलेल्या प्रशासक / प्राधिकृत अधिकारी यांचा ६ महिन्याचा कालावधी दिनांक ३१.०७.२०२१ अखेर पूर्ण झालेला आहे अशा सहकारी संस्थांची माहिती सादर करणे बाबत क्षेत्रीय कार्यालयांना कळविले असता सदरची माहिती प्राधिकरणास प्राप्त झालेली असुन सदर संस्थांच्या निवडणूका प्राधान्याने पुर्ण करावयाच्या आहेत. परिणामी सदर संस्थांचा समावेश टप्पा क्रमांक दोन मध्ये करावा. तसेच अशा संस्थांचा इतर टप्प्यात समावेश झालेला असल्यास संबंधित टप्प्यातून सदर संस्थां वगळून त्यांचा समावेश टप्पा क्रमांक दोन मध्ये करावा, आणि

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र.७ च्या आदेशानुसार "जिल्हा निवडणूक आराखडा" मधील टप्पा क्रमांक एक मधील संस्थांची निवडणूक प्रक्रीया सुरु केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील पहिल्या परंतुकानुसार अकल्पित परिस्थितीत किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सहकारी संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत तात्पुरती मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील तिसऱ्या परंतुकानुसार ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७ - अ व कलम ७८ - अ अंतर्गत प्रशासक/ प्राधिकृत अधिकारी नियुक्त झालेला आहे अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत तात्पुरती मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत,

त्या अर्थी, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणे बाबतची कार्यवाही तात्काळ सुरू करणे आवश्यक असल्यामुळे प्राधिकरण निवडणूकीस पात्र असणा-या सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू करणे बाबत पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच), नियम ६ व नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण निवडणूकीकरीता तयार करण्यात आलेल्या 'जिल्हा निवडणूक आराखडयातील' दुसऱ्या टप्प्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया ('ई' वर्ग संस्था वगळून) सोबत जोडलेल्या परिशिष्ट १, परिशिष्ट २, परिशिष्ट ३ व परिशिष्ट ४ मध्ये नमुद कार्यक्रमाप्रमाणे सुरू करण्यास खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. जिल्हा निवडणूक आराखडयातील दुसऱ्या टप्प्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया **दिनांक ०१.१०.२०२१** पासून सोबत जोडलेल्या परिशिष्ट १, परिशिष्ट २, परिशिष्ट ३ व परिशिष्ट ४ मध्ये नमुद मतदार यादी व निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे सुरू करावी. उपरोक्त संस्थांशिवाय इतर टप्प्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया परस्पर सुरू करू नये. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु न करणेबाबत मा.न्यायालयाचे विशिष्ट संस्थेबाबत आदेश असल्यास अशा संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात येऊ नये.

२. जिल्हा निवडणूक आराखडयातील दुसऱ्या टप्प्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता, प्रारुप व अंतीम मतदार यादया **दिनांक ३०.०९.२०२१** या अर्हता दिनांकावर तयार कराव्यात.

३. मतदार यादी व निवडणूक कार्यक्रमास जास्त खपाच्या एकाच स्थानिक वर्तमान पत्रात शासन मान्य दराने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

४. कोव्हीड - १९ या जागतिक महामारीचा विचार करून निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडताना सामाजिक अंतर राखणे, मास्क वापरणे, सॅनीटायझेशन, थर्मल स्क्रीनींग इ. उपाययोजनांचा अवलंब करावा. तसेच कोव्हीड-१९ बाबत शासनाने घालुन दिलेल्या नियमांचे व मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.

५. जिल्हा निवडणूक आराखडयातील तीन ते सहा टप्प्यातील निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांच्या प्रारुप मतदार यादया तयार करण्यासाठी प्राधिकरणाकडूनच टप्प्या - टप्प्याने अर्हता दिनांक स्वतंत्र आदेशाने घोषित करण्यात येईल.

६. निवडणूकीस पात्र असणा-या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता आवश्यकता असल्यास शासनाच्या इतर विभागातील समकक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

७. प्राधिकरणाकडून जिल्हानिहाय निवडणूक प्रशिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे नियंत्रणाखाली निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दयावे.

८. निवडणूक प्राधान्य, मनुष्यबळ व साधनसामुग्री विचारात घेऊन दिनांक ०१.०१.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२१ या कालावधीत निवडणुकीस पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता प्राधिकरणाकडून स्वतंत्र आदेश पारीत करण्यात येतील.

९. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दिनांक ३०.१०.२०२१ रोजी सुट्टी असूनही, सदर दिनांकास सभासद संस्थांनी दिलेले ठराव कार्यालय सुरु ठेऊन स्वीकारावेत.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

**सोबत** :- परिशिष्ट १, परिशिष्ट २, परिशिष्ट ३ व परिशिष्ट ४

३०/०९/२०२१

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत महितीस्तव :-**

१. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. आयुक्त (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. मा. आयुक्त (मत्स्य), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा. आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. मा. आयुक्त (वस्त्रोदयोग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## परिशिष्ट १

## संघीय सहकारी संस्थेचा संभाव्य मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम

| मतदार यादी कार्यक्रम | | |
|---|---|---|
| १. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी नियम १० (३) अन्वये सभासद संस्थेचे ठराव मागविण्याचा अंतिम दिनांक | १.१०.२०२१ ते ३०.१०.२०२१ |
| २. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्त संस्था प्रतिनिधीचे ठराव संघीय संस्थेस देणे | १.११.२०२१ |
| ३. | संघीय संस्थेने प्रारुप मतदार यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करणेचा दिनांक | १२.११.२०२१ |
| ४. | प्रारुप मतदार यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रसिद्ध करण्याचा दिनांक (नियम ११ (१)) | १७.११.२०२१ |
| ५. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक (नियम ११ (२)) | १७.११.२०२१ ते २६.११.२०२१ |
| ६. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्त आक्षेपांवर निर्णय देणेचा अंतिम दिनांक (नियम ११(३)) | ६.१२.२०२१ |
| ७. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक (नियम ११ (४)) | १०.१२.२०२१ |
| **निवडणूक कार्यक्रम** | | |
| १. | नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती | २०.१२.२०२१ ते २४.१२.२०२१ |
| २. | नामनिर्देशन पत्र प्रसिद्धी | २०.१२.२०२१ ते २४.१२.२०२१ |
| ३. | नामनिर्देशन छाननी | २७.१२.२०२१ |
| ४. | वैध नामनिर्देशन पत्र यादी प्रसिध्द करणे | २८.१२.२०२१ |
| ५. | उमेदवारी अर्ज माघारी घेणे | २८.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ |
| ६. | अंतिम उमेदवारांची यादी | १२.०१.२०२२ |
| ७. | मतदान | १९.०१.२०२२ |
| ८. | मतमोजणी | २०.०१.२०२२ |
| ९. | पदाधिकारी निवड | ३१.०१.२०२२ |

## परिशिष्ट २

## अ व ब वर्ग सहकारी बँकेचा संभाव्य मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम

| मतदार यादी कार्यक्रम | | |
|---|---|---|
| १. | संस्थांनी सुधारीत प्रारुप मतदार यादी तयार करुन जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करण्याचा दिनांक | ८.१०.२०२१ |
| २. | प्रारुप मतदार यादी जिल्हा सहकारी निवडणूकअधिकारी यांनी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १३.१०.२०२१ |
| ३. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २२.१०.२०२१ |
| ४. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्तआक्षेपांवर निर्णय देण्याचा अंतिम दिनांक | ०१.११.२०२१ |
| ५. | जिल्हा सहकारी निवडणूकअधिकारी यांनी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०३.११.२०२१ |
| **निवडणूक कार्यक्रम** | | |
| १. | नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती | १८.११.२०२१ ते २५.११.२०२१ |
| २. | नामनिर्देशन पत्र प्रसिद्धी | १८.११.२०२१ ते २५.११.२०२१ |
| ३. | छाननी | २६.११.२०२१ |
| ४. | वैध नामनिर्देशन पत्र यादी प्रसिध्द करणे | २९.११.२०२१ |
| ५. | उमेदवारी अर्ज माघारी घेणे | २९.११.२०२१ ते १३.१२.२०२१ |
| ६. | अंतिम उमेदवारांची यादी | १४.१२.२०२१ |
| ७. | मतदान | २१.१२.२०२१ |
| ८. | मतमोजणी | २३.१२.२०२१ |
| ९. | पदाधिकारी निवड | ३१.१२.२०२१ |

## परिशिष्ट ३

## क वर्ग सहकारी बँकेचा संभाव्य मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| | **मतदार यादी कार्यक्रम** | |
| १. | संस्थांनी सुधारीत प्रारुप मतदार यादी तयार करुन तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करण्याचा दिनांक | ८.१०.२०२१ |
| २. | प्रारुप मतदार यादी तालुका सहकारी निवडणूकअधिकारी यांनी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १२.१०.२०२१ |
| ३. | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १८.१०.२०२१ |
| ४. | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्तआक्षेपांवर निर्णय देण्याचा अंतिम दिनांक | २२.१०.२०२१ |
| ५. | तालुका सहकारी निवडणूकअधिकारी यांनी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २२.१०.२०२१ |
| | **निवडणूक कार्यक्रम** | |
| १. | नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती | २५.१०.२०२१ ते २९.१०.२०२१ |
| २. | नामनिर्देशन पत्र प्रसिद्धी | २५.१०.२०२१ ते २९.१०.२०२१ |
| ३. | छाननी | ०१.११.२०२१ |
| ४. | वैध नामनिर्देशन पत्र यादी प्रसिध्द करणे | ०२.११.२०२१ |
| ५. | उमेदवारी अर्ज माघारी घेणे | ०२.११.२०२१ ते १६.११.२०२१ |
| ६. | अंतिम उमेदवारांची यादी | १७.११.२०२१ |
| ७. | मतदान | २१.११.२०२१ |
| ८. | मतमोजणी | २१.११.२०२१ |
| ९. | पदाधिकारी निवड | ३०.११.२०२१ |

## परिशिष्ट ४

## ड वर्ग सहकारी बँकेचा संभाव्य मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| | **मतदार यादी कार्यक्रम** | |
| १. | संस्थांनी सुधारीत प्रारुप मतदार यादी तयार करुन तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करण्याचा दिनांक | ८.१०.२०२१ |
| २. | प्रारुप मतदार यादी तालुका सहकारी निवडणूकअधिकारी यांनी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १२.१०.२०२१ |
| ३. | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १८.१०.२०२१ |
| ४. | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्तआक्षेपांवर निर्णय देण्याचा अंतिम दिनांक | २२.१०.२०२१ |
| ५. | तालुका सहकारी निवडणूकअधिकारी यांनी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २२.१०.२०२१ |
| | **निवडणूक कार्यक्रम** | |
| १. | अधिमंडळ विशेष सभेसाठी प्राधिकृत अधिकारी यांनी नोटिस देण्याचा दिनांक | २५.१०.२०२१ |
| २. | अधिमंडळ विशेष सभेचा दिनांक | १४.११.२०२१ |
| ३. | पदाधिकारी निवड | ३०.११.२०२१ |

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.